# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २९.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २८/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५० वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ८५,९५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २८/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन २.५ लिटर दारू असा एकुण १,२००/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. २८/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ११,६३०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**खुनाचा प्रयत्न करणा—या विरूध्द अपराध दाखल :—**

दिनांक २८/१२/२०२२ रोजी पोस्टे आ.बाळापुर येथे कलम ३०७, ३२६, ३२४, ३२३,१४३,१४७,१४८,१४९,४५२,५०४,५०६ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीतांनी गैरकाद्याची मंडळी जमवुन मौजे कांडली येथील ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये वार्ड क्र २ मध्ये शेख सदाम शेख अखतर यांना उमदेवार म्हणुन का उभे केले या कारणावरून यातील आरोपी यांनी यातील जख्मी व फिर्यादी यांना ईनको खतम करो इनको जान से मारो डालो असे म्हणुन जिवे मारण्याची उद्देशाने लोखंडी रॉड, लोखंडी गजाळी व लाकडी लाठयाने व थापड बुक्यांनी फिर्यादी व जख्मीचे घरामध्ये घुसन डोक्यास, हातपायावर,पाठीवर मारहाण करून गंभीर जख्मी केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.